## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

या विभागाकडून विद्यापीठ व महाविद्यालयातील अंतर्गत परीक्षांचे आयोजन केले जाते. विद्यापीठाच्या ऑक्टो. व नोव्हें. व मार्च/एप्रिल अशा दोन परीक्षा घेतल्या जातात. तसेच विद्यार्थ्यांना वेळोवेळी परीक्षा संदर्भात येणाऱ्या सूचना दिल्या जातात. तसेच परीक्षेचे शाखानिहाय निकाल तयार करण्याचे काम याच विभागाकडून केले जाते.

### १) उद्‌बोधन :

विद्यार्थ्यांना मोबाईल न वापरणे, कॉपीमुक्त परीक्षा, वेळेवर हजर राहणे, संभाव्यत: परीक्षा कालावधी, प्रश्नपत्रीकांचे स्वरूप-रिकाम्या जागा, एका वाक्यात उत्तरे, लघुत्तरी प्रश्न, दिर्घोत्तरी प्रश्न, एकूण गुण, उत्तीर्णसाठी गुण, एटीकेटी, संगणक परीक्षा, पर्यावरण परीक्षा, एमपी केस, आदी परीक्षेसंदर्भातील उद्‌बोधन कार्यक्रमात दि. १२/०८/२०१७ रोजी करण्यात आले.



### २) बैठक व्यवस्थेत बदल :

महाविद्यालयात पूर्वी प्रत्येक वर्गात खडूने विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक लिहिले जात असत. यावर्षीपासून आपण संगणकावर कक्षनिहाय नंबर टाईप करून वर्गाच्या बाहेर डकवण्यात आले. बैठक क्रमांकासमोर एक कोड टाकण्यात आला. हा कोड वर्गात पेनाने फक्त एकदाच लिहण्यात आला. सदरील विद्यार्थी त्या कोडवर जाऊन बसायचा. त्यामुळे वर्गात नंबर लिहिण्याचे टळले व काम सोपे झाले.

**३) मोबाईल ठेवण्याची सुविधा :**

परीक्षेच्या कालावधीत परीक्षार्थी परीक्षा दालनात स्वत:चे मोबाईल आणतात. म्हणून महाविद्यालयाने यावर्षीपासून वर्गाच्या बाहेर मोबाईल न ठेवता कार्यालयात मोबाईल ठेवण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. पहिल्या दिवशी सगळया विद्यार्थ्यांना सूचना देण्यात आल्या व त्यांचे मोबाईल कार्यालयात त्या दिवसापुरते विनामुल्य जमा करून घेण्यात आले. एक क्रमांक असलेला कागद एक विद्यार्थ्यांना व एक कागद मोबाईलला लावून तो कार्यालयात जमा करून घेण्यात आला. परंतु दुसऱ्या दिवसापासून जे परीक्षार्थी मोबाईल आणतील त्यांना दहा रुपये दंड आकारण्यात आला. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून ही सुविधा आपण सुरू ठेवली.

**४) प्रथम सत्रांत परीक्षा :**

कालावधी: १० ते २९ ऑक्टोबर २०१७

केंद्रप्रमुख: डॉ. पी. एम. कल्याणकर

सहकेंद्रप्रमुख:

अंडरस्टडी : विजय पांडे

प्रश्नपत्रिका डाऊनलोड : प्रेम चव्हाण

उत्तरपत्रिका रेकॉर्ड : बाबासाहेब दाभाडे

इतर कामे: रत्नाकर जाधव, जयराम जाधव, विनोद तुपे, रमेश जगधने

**५) द्वितीय सत्रांत परीक्षा :**

कालावधी: १७ मार्च ते १० एप्रिल २०१८

केंद्रप्रमुख: प्राचार्य डॉ. एस. आर. टकले

सहकेंद्रप्रमुख:

अंडरस्टडी : विजय पांडे

प्रश्नपत्रिका डाऊनलोड : प्रेम चव्हाण

उत्तरपत्रिका रेकॉर्ड : बाबासाहेब दाभाडे

इतर कामे: रत्नाकर जाधव, जयराम जाधव, रमेश जगधने, विनोद तुपे

अंतर्गत भरारी पथक :

डॉ. पी. एम. कल्याणकर व डॉ. एम. एम. नळगीरकर - १६ ते २६ मार्च २०१८